# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**
**बोर्ड क्र. ३३ ते ३५ (एकुण-०७)**
**व्दितीय अपील क्रमांक :- १०६४, १०६५ व १०९२ / २०२३**

श्री.संजय कारभारी कुटे, **अपिलार्थी**
रा.बेलतगव्हाण कुटे मळा, ता.जि.नाशिक

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी** **उत्तरवादी क्र.१**

| बोर्ड क्र. | जन माहिती अधिकारी तथा |
|---|---|
| ३३, ३४, ३५ | ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, बेलतगव्हाण, ता.जि.नाशिक |

**प्रथम अपिलीय अधिकारी,** **उत्तरवादी क्र.२**

| बोर्ड क्र. | प्रथम अपिलीय अधिकारी, तथा |
|---|---|
| ३३, ३४, ३५ | सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नाशिक |

**(सुनावणी दि.०४/०८/२०२६)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये एकुण ०३ व्दितीय अपील दाखल केलेले आहेत. त्यानुसार सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आलेले आहे. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.अभिषेक उत्तम मते, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.एम.बी.चव्हाण, क.सहा. उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र - अ नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ३३ | ३०.०९.२०२२ | बेलतगव्हाण ग्रा.पं.च्या हद्दीत किती स्ट्रीट लाईट आहे व कोणत्या कोणत्या जागेवर बसवले आहे त्या ठिकाणाची माहिती मिळावी व किती पोल आहे त्या पोलांची संख्या मिळावी, १५ ऑगस्ट २०२२ च्या ग्रामसभेच्या प्रोसेडींगच्या नकला मिळाव्या, ग्रामस्थांनी स्वाक्षरी केलेल्या व ठराव झालेल्या मिळाव्या, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर २०२२ पासुन मासिक सभेच्या प्रोसेडींगच्या नकला, |

| | | |
|---|---|---|
| ३४ | २३.०९.२०२२ | संजय कारभारी कुटे यांनी ग्रामसेवक पटेल यांना ३ अर्ज दिले होते ह्या दि.२८.०७.२०२२ रोजी दुसरा अर्ज दि.२५.०८.२०२२ रोजी तिसरा अर्ज दि.३०.०८.२०२२ रोजी ह्या अर्जावर आजपावेतो काय चौकशी झाली व काय प्रशासकीय कारवाई करण्यात आली व अर्जदार यांना काय पत्रव्यवहार करण्यात आला त्या पत्रव्यवहार केलेल्या पत्रांच्या झेरॉक्स प्रती मिळाव्या, व जावक रजिस्टर्ड नोंदवहीच्या पत्रव्यवहार केलेल्या झेरॉक्स प्रती, बेलतगव्हाण ग्रा.पं.येथे सन जानेवारी २०१० पासुन किती ग्रामसेवकांना चार्ज दिला आहे त्या ग्रामसेवकांचे नावे मिळावे व चार्ज घेतलेल्या चार्ज यादीच्या झेरॉक्स प्रती मिळाव्या चार्ज घेतलेल्या ग्रामसेवकांच्या यादी मिळावी, |
| ३५ | १७.१०.२०२२ | बेलतगव्हाण ग्रामपंचायत कार्यालयातील रजिस्टर्ड नमुना ८ नियम ३२ (१) नोंदवहीच्या सन २०१९-२०२३ या वर्षासाठी कर आकारणी नोंदवहीच्या सत्य झेरॉक्स प्रती, महाले ग्रामसेवक यांनी चार्ज घेतल्यापासुन व पटेल ग्रामसेवक क़िती घरपट्या लावण्यात आलेल्या आहे त्याची लेखी स्वरुपात माहिती मिळावी व घरपट्या लावण्यात आलेल्या घरपट्यांच्या सत्य झेरॉक्स प्रती मिळाव्या, सन जानेवारी २०१९ ते सन २०२२ पर्यंत, |

२. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती अर्जावर कार्यवाही केली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द यथोचित कारवाई प्रस्तावित करण्यात यावी.

३. जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्याबाबतची कारवाई करण्यात येईल.

४. प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळावी, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कार्यवाही केलेली नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप विचारात घेता, मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम २ (J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, बेलतगव्हाण, ता.जि.नाशिक यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद तीनही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली प्रति माहिती अर्ज ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना प्रति माहिती अर्ज ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, बेलतगव्हाण, ता.जि.नाशिक यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार मुदतीत सुसंगत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद कालावधीत खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नाशिक यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या **दि.१८.११.२०२२, दि.०१.११.२०२२, दि.१८.११.२०२२** रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नाशिक यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. उपरोक्त निर्देशासह तीन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

**(प्रकाश इंदलकर)**
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक.

**जावक क्र.** ८८८४ **दिनांक :** ०९/०८/२०२४

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नाशिक